# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०२/२०१३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक ०७/०२/२०१३ रोजी सभा सुचना क्र. ०४ दि. ०२/०२/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. राजु यशवंत भोईर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

१. श्री. राजु यशवंत भोईर
२. श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
३. श्रीम. अनिता जयवंत पाटील
४. श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो
५. श्री. मुन्ना सिंह
६. श्री. प्रमोद जयराम सामंत
७. श्री. राजेश शंकर वेतोसकर
८. श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन
९. श्री. रोहिदास शंकर पाटील
१०. श्री. शरद केशव पाटील
११. श्रीम. मिरादेवी यादव
१२. डॉ. राजेंद्र जैन
१३. श्री. संदिप मोहन पाटील
१४. श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी

**गैरहजर सदस्य –**

१.) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील

**मा. सभापती :-**

नविन आयुक्त साहेबांच हार्दिक स्वागत. आज स्थायी समितीसाठी आपले नविन आयुक्त साहेब पहिल्यांदाच येथे उपस्थित आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रशासनाच्या मार्गदर्शनाने, सर्व सदस्यांच्या सहकार्याने आपल्या मिरा भाईंदर शहरासाठी व्यवस्थित आणि चांगली कामे करण्याचे प्रयत्न करुन आजची सभा सचिव साहेबांनी चालू करावी.

**मा. आयुक्त :-**

आपल्या अनुमतीने मी माझा परिचय करुन देतो. माझ नाव आहे सुरेश काकाणी. भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी आहे २००३ वर्षाचा. आणि ह्या २८ तारखेपासुन मी मिरा भाईंदर महापालिकेमध्ये आयुक्त पदावर रुजु झालेलो आहे. आपल्यापैकी काही सन्मा. सदस्यांची भेट झालेली आहे आणि आपलीच भेट घेण्यासाठी मी आज इथे प्रामुख्याने आलेलो आहे. तर माझी विनंती अशी राहिल की, आपल्या सर्वांचा परिचय एकदा झाला की, नंतर आपण सभेच्या कामकाजाला सुरुवात केली तर अधिक सोयीस्कर ठरेल. आणि आपला सगळ्यांचा हेतु एकच आहे की, आपल्या मिरा भाईंदर शहराचा विकास झाला पाहिजे. इथे राहणाऱ्या जनतेच जीवन जितक सुसह्य करता येईल. ठिक आहे. अडचणी अनंत आहे. पिण्याच्या पाण्याची समस्या असेल किंवा अंडर ग्राऊंड सिव्हरेज सिस्टम असेल किंवा मनोरंजनाच्या सोयीसुविधा असतील. तिथल बरचस जनता जी आहे ती मुंबई किंवा ठाणे परिसरामध्ये सेवेला जाते आणि संध्याकाळी परत येते. तर स्टेशनवर जाण्यासाठी जो मार्ग असेल अशा बऱ्याच समस्यांचा मी अभ्यास करत आहे. आठवड्यातुन काही कालावधी २ दिवस, ३ दिवस, प्रभागामध्ये किंवा शहरामध्ये किंवा आणखीन कुठे महत्वाच ठिकाण आहे जिथे समस्या आहे, तिथे भेटी द्याव्यात. आणि त्यातुन आपल्यामार्फत किंवा जनतेमार्फत समस्या ऐकुन घ्याव्यात आणि त्या सोडवण्यासाठी प्रयत्न कराव्यात. सगळ्याच समस्या सुटतील अस या मताचा मी नाही. पण आपण प्रयत्न करायला पाहिजे आणि त्या प्रयत्नाला आपल्या सगळ्यांची साथ राहिल असा मला विश्वास वाटतो. तर माझी आपल्या सगळ्यांना विनंती आहे की, आपण जर आपला परिचय करुन दिला तर त्याप्रमाणे मला दुसऱ्या कामाकडे जाता येईल. आपल्या सभेच कामकाज पुढे सुरु ठेवता येईल. धन्यवाद.

(सगळ्यांनी स्वतःचा परिचय करुन दिला.)

**प्र. नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. ०७/०२/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०४, दि. ०२/०२/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. २७, दि. ०५/०१/२०१३ व २१/०१/२०१३ रोजींचे मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**बर्नड डिमेलो :-**

दि. ०५/०१/२०१३ व २१/०१/२०१३ रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**प्रमोद सामंत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २७ :-**

दि. ०५/०१/२०१३ व २१/०१/२०१३ रोजींचे मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. २७ :-**

दि. ०५/०१/२०१३ व २१/०१/२०१३ रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २८, मिरा भाईंदर महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांचे सेवापुस्तके पडताळणी करणेबाबत.

**रोहिदास पाटील :-**

महापालिकेच्या शाळेमध्ये पालकांच इतकस मत चांगल नाही. हे आपल्या लक्षात येत. त्यातल्या दोन गोष्टी आपल्याला सांगतो. आपल्या महापालिकेच्या शाळेमध्ये पालकांनी विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा. अशा परिस्थितीत निर्माण करण्यासाठी आपल्या महापालिका शाळेची खालची टाकी वरची टाकी दोन टाक्या आहेत. असे रिपोटींग होते की, त्या टाक्या साफच होत नाही. त्या टाक्या कोण साफ करेन, कधी करणार आणि कोण करणार? अपली एजन्सी आहे किंवा नसेल तर तातडीने निर्देश द्यावेत अशी आमची विनंती आहे. काल काय नाही केल असे विचारण्यापेक्षा आज ते करावे. जेणेकरुन खालची व वरची टाकी साफ झाली पाहिजे. महिनो न महिने टाकी साफ होत नाही. आपण एजन्सी नाही नेमली असे समजते. किंव एजन्सी नेमली आणि तो काम करत नाही. मी शाळेवर व्हिजिट देऊन विचारल की, टाकी कधी साफ केली. तर ते उत्तर देत नाही. ज्या शाळा चालतात. शाळेच वातावरण व्यवस्थित नाही. मी आपल्याला पत्र दिलेल आहे ५२ शिक्षक आहेत. आता आपल्या शाळेमध्ये आधार केंद्र चालते. आधार केंद्र सकाळी ६ वाजल्यापासुन चालू होते ते संध्याकाळ पर्यंत असते. त्याच्यावर रोज भांडण, रोज आरडाओरड, त्यांची गर्दी, आपली सगळी मुले-मुली लहान त्याच्यामध्ये त्यांची गर्दी. काही ठिकाणी पहिल्या माळ्यावर आहे. काही ठिकाणी ग्राऊंड फ्लोरला आहे. ही अवस्था जी तिथे होते. त्यामुळे शाळेच वातावरण राहत नाही. शालेय वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने तातडीने ही प्रायव्हेट एजन्सी आहे. जी कोण आधार केंद्राच काम करते. आपण जर त्यांना सांगितल की, तुम्ही तुमच्या मर्जीने कुठेही खाजगी जागा घ्या. शाळेतुन ती केंद्र निघावी. अशी आमची विनंती आहे. आपण त्या दृष्टीने लक्ष द्या. दुसरा विषय असा आहे, परिवहन चालते. आपली बस सुटते. बाहेरुन येते. ज्या ठिकाणी स्टारटिंग पॉईंट आहे. ड्रायव्हरला लघवीला, संडासला कुठलीच व्यवस्था नसते. ह्या तीन गोष्टी मी तुमच्या समोर तातडीच्या मांडल्या. म्हणजे उदा. सांगायच झाल तर मी स्टेशन समोर पुर्वेला बंदरवाडीला नाना चौक म्हणून तो स्टँड आहे. नाना चौक मध्ये आपल्या बसेस उभ्या राहतात. बेस्टच्या बसेस उभ्या राहतात. एस.टी.च्या बसेस उभ्या राहतात. बेस्टच्या ड्रायव्हर घाटकोपर वरुन येतो. तो ड्रायव्हर आला की, जर समजा जायचच आहे. तो गाडी आडवी, तिडवी कसाही सोडतो आणि धावत सुटतो. त्याला बऱ्याच लांब जायला लागते. संडाससाठी, लघवीसाठी. मग त्याने आणखीन ट्राफिक जाम होते. म्हणून तुम्हाला विनंती आहे की, तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण चांगले मुद्दे उपस्थित केले. त्याबद्दल मी आपला आभार व्यक्त करतो. आणि मी आल्यानंतर मी हेच ठरवले आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळा असेल, वैद्यकिय दवाखाने असतील किंवा महानगरपालिकेचे स्मशानभुमी असेल मी कालच एक स्मशानभुमीला सुध्दा भेट देऊन आलो. आणि प्रत्येक शाळेला सुध्दा भेट द्यायचा उद्देश हाच आहे की, तेथील वातावरण, तेथील दर्जा म्हणजे कस आहे की, महानगरपालिका शाळा असली की, तर अनुभव चांगला नसतो, किंवा जिल्हा परिषद शाळा असल्या की पालकांचा रोख असा असतो की, प्रायव्हेट शाळेत घालुन फी आपल्याला जास्त द्यायला लागली तरी चालेल. पण महानगरपालिकेच्या शाळेमध्ये नको. तर त्यामध्ये प्रथम शिक्षणाचा दर्जा उंचावणे त्यांच्या विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आवश्यकतेप्रमाणे प्रशिक्षण देणे, त्याच्यानंतर शिक्षणाचा दर्जा उंचावणे. त्याच्यानंतर तेथे आवश्यक सोयी सुविधा ज्या आहेत. तेथे मुलींसाठी, मुलांसाठी वेगवेगळे टॉयलेट ब्लॉक असतील. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असेल. पाणी चांगल निर्जतुंक असाव. त्याची व्यवस्था असेल. मी हे दोन महत्वाचे विषय अजेंडावर ठेवलेले आहेत की, शाळेमध्ये आवश्यकता बेसिक सु-सुविधा जे आहे. निदान त्यातरी त्यांना मिळाव्यात. तिथे त्यांना क्रिडामध्ये सहभागी होता व्हाव. जेणेकरुन त्यांच अभ्यासाकडे जास्त लक्ष लागेल. सध्याच्या इंटरनेटच्या युगामध्ये, मोबाईलच्या सगळ्या सोशल मिडीयाच्या युगामध्ये त्याच्याकडे जास्त लक्ष न देता त्यांना शारिरीक श्रम करावे लागले तर तो अंजेडा मी ठेवलेला आहे. आणि तिसरं शाळेमध्ये शिक्षण बाह्य ज्या गोष्टी चालतात. त्याच्याबद्दल कस आपल्याला करता येईल. ते मी आपल्या सध्या आश्वासित करु इच्छित नाही. पण, त्यामध्ये पण मी निश्चित लक्ष घालेल, त्यांची कुठे पर्यायी व्यवस्था होत असेल. आता, आपण आधार केंद्राच कार्डच सांगितल, खाजगी संस्था आहे. राष्टीय कार्यक्रम आहे आणि इतरत्र जागा कुठे उपलब्ध आहे का? कारण, आपल्या सगळ्या सव्वा आठ लाख जनतांना आधारकार्ड द्यायच आहे. तर त्यासाठी निदान म्हणजे ८०,१०० तरी आधारकार्ड असण आवश्यक आहे. पण तिकडे आधार कार्ड केंद्र सध्या सुरु नाही ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. तर विहीत काल मार्यादामध्ये करण्यासाठी कदाचित प्रशासनाने पूर्वी तसा निर्णय घेतला असेल. पण, त्यामध्ये आणखीन मार्ग काय काढता येतो? किंवा त्यांच्या कामाचे तास आणि शिक्षणाचे तास याच काही आपल्याला वेगळेवेगळ करता येईल. आपण या सुचना मांडल्या त्याबद्दल मी सुचनांच स्वागत करतो. निश्चितपणे आपण त्यावर सगळे मिळून काम करु. असा मी या ठिकाणी विश्वास व्यक्त करतो.

**बर्नड डिमेलो :-**

साहेब तुम्ही आतापर्यंत उत्तन परिसर बघितला असेल. मला तरी वाटते. पूर्ण मिरा भाईंदरचा फेरफटका मारला असेल. उत्तन परिसर हा एम.एम.आर.डी.ए. मध्ये जरी गेला असला तरी तिथे इतर जातीच्या धर्माची लोक राहतात. चारही बाजुला समुद्र आहे. मिरा भाईंदरला मासेमारी करणारी लोक जास्त राहतात. आणि पर्यंटक मोठ्या प्रमाणात आहे. जसे एस्सलवर्ड, हॉटेल्स, रेसॉर्ट भरपूर आहे. आणि तिर्थक्षेत्र वेलंकनी मातेच म्हणा, सेनन ग्रुप चर्च, बरेचसे चर्च, मंदिर, मस्जिद, दर्गे, धारावी मंदिर आहे. तिथे पर्यटक एवढया मोठ्या प्रमाणावर आहे. पण खेदाची गोष्ट आहे की, एवढया वर्षात आम्हालाच एवढ वाटते. पण, प्रशासन का करत नाहीत. तर तुम्ही त्यावर नजर टाकुन, जस गोवाप्रमाणे आपला किनारा सापडला तो कसा स्वच्छ राहिल आणि पर्यटकांना त्रास न होता रस्त्याची दुरुस्ती करुन अगदी सुस्वच्छ रस्ते, करायचा प्रयत्न करावा. आमच सहकार्य तुमच्या बरोबर राहिल. राष्ट्रवादीचा गटनेता मी म्हणुन आमचा पक्ष पण तुमच्या पाठीशी राहिल. हे आम्ही तुम्हाला ग्वाही देतो.

**प्रशांत दळवी :-**

साहेब, माझी एक विनंती आहे की, जे सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला शौचालयाचा. मिरारोडमध्ये शांतीनगर वसाहत आहे ती आशिया खंडामध्ये एक नंबर आहे. तिथे ११ सेक्टर आहेत. एका सेक्टरमध्ये कमीत कमी ४५ ते ५० बिल्डींग आहेत. अशा परिस्थितीमध्ये आपले मिरा भाईंदर महानगरपालिकेच शौचालय स्टेशन वर होत. परंतु, काही महिन्याच्या कालावधीत निष्कर्षित करण्यात आलेला आहे. रस्ता रुंदीमुळे परंतु, आज एवढी गैरसोय होते की, स्टेशनवर शौचालय उपलब्ध नाही. आपल्या स्टेशनच्या दोन्ही बाजुला शौचालय उपलब्ध नाही. रिक्षा स्टॅन्ड आहेत. रिक्षा स्टॅन्डचे जे चालक आहेत. ते त्यासाईडला तिथे त्यांच ते करुन घेतात. परंतु, ज्या महिला वर्ग आहेत. महिला वर्गांना फार त्रास होतो. आयुक्त साहेब, मी आपल्याला पत्र दिलेल आहे. बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा. अशा पध्दतीच आपण धोरण अवलंबुन त्या ठिकाणी शांती स्टार बिल्डरला आपण बोलवून त्यांची एक बैठक घेऊन त्या ठिकाणी त्यांना विनंती करुन त्या ठिकाणी शौचालय उभाराव. अशी मी आपणांस विनंती करतो आणि दुसरा मुद्दा असा आहे की, अनधिकृत फेरिवाले आज स्टेशन परिसरात म्हटले की, दोन्ही ठिकाणी स्टेशन परिसरातले सेक्टर क्र. ५ किंवा ४ म्हटले की ५ मिनीटाच अंतर आहे ते परंतु, आज महिला वर्ग, पुरुष वर्गांना त्या ठिकाणी आपल्या घरी जाण्यासाठी पायी जायला १५ ते २० मिनिट लागतात. एवढा सुळसुळाट झालेला आहे फेरिवाल्यांचा. फेरिवाल्यांना त्यांच्या हातगाड्या, रिक्षा अशा परिस्थितीत त्यांना तोंड द्याव लागत. आणि ही पण माझी विनंती राहिल की कृपया आपण याच्यावर लक्ष घालुन प्रश्न तातडीने सोडवा.

**राजेश वेतोसकर :-**

साहेब, माझी पण सुचना अशी आहे की, त्यांनी बोलले अनधिकृत फेरिवाले. तर आपल्या नवघर रोडमध्ये पण अनधिकृत फेरिवाले भरपुर आहेत. आणि आमच्या ऑफिस समोर आजच अशी घटना घडली. तिथे इडली सांभारची गाडी लागते. तिथे सिलेंडरचा ब्लास्ट झाला. आणखीन आजूबाजूच्या गाड्यांची कर्वस जळाली. आजूबाजूच्या लोकांनी पटकन धाव घेऊन ते आग आटोक्यात आणली. पण, ह्याच्या अगोदर आम्ही त्या गाडीच्या बाबतीत तक्रारी पण केलेल्या होत्या. पण, ती गाडी हटतच नाही. ऑफिसच्या समोर संपूर्णपणे त्या अनधिकृत फेरीवाल्यांचा घोळका पडलेला आहे.

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, फेरीवाल्यांचा विषय हा सगळ्या ठिकाणी आहे. आमच्या इथे बाळाराम पाटील रस्ता आहे. तो एवढा अरुंद आहे. आणि त्याच्या दोन्ही बाजूने फेरीवाले बसलेले असतात. आणि तो आपण ना फेरीवाला क्षेत्र म्हणुन डिक्लेर केलेला आहे. तरी सुध्दा त्याच्यावर कुठलीही कारवाई हात नाही. पूर्ण मिरा भाईंदरमध्ये जेवढे पण ना फेरीवाला क्षेत्र आहेत तेवढयांवर आपण कारवाई करावी. आपल्या नेतृत्वाखाली सुसज्जपणे कारवाई झाली पाहिजे.

**हेलन गोविंद :-**

सन्मा. आयुक्त साहेब, आमच्या परिसरात सुध्दा चौकची शाळा आहे महानगरपालिकेची. तिथे शिक्षक व्यवस्थित जात नाही. त्याच्यानंतर सुट्टया घेतात. मुलांना व्यवस्थित शिकवण्याचा दर्जा नसल्यामुळे ते गळतीच प्रमाण कमी झाल आहे. त्याच्यानंतर संडासची व्यवस्था नाही. बऱ्याच वेळा सांगुन सुध्दा संडास व्यवस्थित करत नाही. पाण्याचा खुप प्रोब्लेम आहे. त्याच्यामुळे त्या गावातली मुले शाळेत जायला मागत नाही. गरीब लोकांच तिथे खुप हाल होत. आणि पालीच्या शाळेत सुध्दा गळतीच प्रमाण कमी झालेल आहे. आणि शाळा ती पूर्ण बंद झाली. तर आपल उत्तन पासुन पाली, चौक, डोंगरी परिसरामध्ये ज्या-ज्या आपल्या महानगरपालिकेच्या शाळेत आयुक्त साहेब तुम्ही प्रत्यक्ष जाऊन पाहणी करा. आणि तुम्हाला समलेज की, इतक्या वर्षात आपल गळतीच प्रमाण का कमी झाल? कारण तिथे लांब असल्यामुळे शिक्षण पण खुप सुट्टीवर असतात. आणि वेळेवर जात नाही. तर तुम्ही तिथे लक्ष घाला.

**मुन्ना सिंग :-**

सर, केबिन रोड नाके पर ईस्ट-वेस्ट का काम चालु है। ब्रिज का काम चालू होने के पहले धंदे लगते थे, तो वह लगते है। लेकिन अब वहाँ खड्डा किया है, फिर भी फेरीवाले जाम करके रखे है। वहाँ पर भेजके धंदेवाले को हटा देंगे तो अच्छा होगा। स्कुल वालो को ज्यादा तकलीफ होती है।

**संदिप पाटील :-**

साहेब, माझी सुचना आहे. राई, मुर्धा, मोर्वा येथे एम.एम.आर.डी.ए. ने जे संडास बांधलेल आहे. त्या संडासाच काम ठेकेदाराने चालू केलेल आहे. ठेका पध्दतीने काम चालु झाल्यानंतर त्या ठेकेदाराने अजुन पर्यंत तिथे ना लाईची बिल भरली ना तिथे दरवाजाची व्यवस्था केली. आणि त्याच्यामध्ये अस झाल आहे की, आपल्या पाणी पुरवठा विभागाने आपल्या नळाचे कनेक्शन पण कापलेली आहेत. जे शौचालय आहे त्याला पाण्याचा पुरवठा होत नाही. तर साफसफाई राहिल कशी? तर माझ निवेदन आहे की, जरा जातीने लक्ष द्याव. कारण सगळ्यांचा हिताचा प्रश्न आहे.

**प्रमोद सामंत :-**

हे सगळ अनधिकृत फेरिवाले, अनधिकृत सगळ्या गोष्टीचा विषय होता. अधिकृत जी काम होतात. सिव्हरेजच काम चालु आहे. पाण्याच काम चालु आहे. रस्त्याच कुठे काम चालु आहे. टाटा पावरच काम चालु आहे. श्रीजी केबल, एच.पी सेलला आपण परवानगी दिली आहे. ह्या सगळ्या कामांचा आपसात कुठलाही ताळतंत्र नाही आहे. तिथे सिव्हरेजच काम चालु आहे. तिथेच फायबर टाकायच काम चालु आहे. तिथेच पाण्याच काम चालु आहे. सिव्हरेजच्या कामामुळे ४-४ महिने एक-एक रस्ता बंद आहे. मुख्य रस्ता ४ महिने बंद आहे. त्यामधुन बी.एस.टी. ची बस जाते. आपल्या परिवहनच्या बसेस आहेत. स्कूलच्या बसेस आहेत. सगळ्यांचे रुट बदलण्यांत आले. आणि ४-४ महिने एखादा मुख्य रस्ता बंद राहिल्याने तिकडचे जे नागरिक आहेत. जे अधिकृत नागरिक आहेत, अधिकृत धंदा करणारे आहेत त्यांचे पण हाल होतात. त्यांचे दुकान भाड्याने घेतलेली बंद करावे लागले. तर त्या विषयावर पण आपण बघायला पाहिजे. दुसर ते अंडर ग्राऊंड फायबर टाकण्याच काम चालु आहे. आपण परवानगी दिली आहे. अराऊंड ४२ कि.मी. ची परवानगी दिली आहे. त्याचा जर तुम्ही मॅप बघितलात जे त्यांनी आपल्याकडे सबमिट केल आहे. मला अस वाटते त्या विषयावर आपण तातडीने लक्ष दिल पाहिजे. त्यांच काम पूर्णपणे बंद केल पाहिजे. आणि त्यांच्या ज्या परवानग्या आहेत. त्या रिव्हाईज परवानग्या आल्या शिवाय त्यांना काम करुन दिल नाही पाहिजे. मी आधी पण पत्र दिल आहे. पत्राच मला कुठलच उत्तर येत नाही. या लोकांना आपण ४२ कि.मी. ची परवानगी दिली आहे. २ फेजमध्ये किती पैसे घेतले काय दिले? परवानगी कशी दिली जाते. मला माहित नाही. पण ती परवानगी निव्वळ एका सहीने परवानगीने दिली आहे. कुठल्याही जे.ई.ला काहीच माहित नाही. हाताने प्लॅन काढून त्यांनी दिलेले आहे. त्याचा कुठलाही सर्व्हे केलेला नाही की ते बरोबर केबल टाकतात. ते ४२ कि.मी. आहे की ५० कि.मी. आहे की १०० कि.मी. आहे. कुठलाही त्याच्यावर मार्किंग नाही आहे. आज मी एका ठिकाणी काम थांबवल्यावरती नविन रिव्हाईज ६ कि.मी. ची

परवानगी घेऊन आली. नविन जे ६ कि.मी. ची परवानगी आली आहे. त्यांचे पेपर माझ्याकडे आहे. ६ कि.मी. च्या परवानगीमध्ये नविन रस्ते, नविन स्टार्ट पॉईंट आणि नविन End Point दिलेले आहे. आणि परवानगी दिलेली आहे. नविन दिलेली परवानगी बरोबर आहे. पण जुनी परवानगी जर चुकीची असेल तर माझ्या माहिती प्रमाणे त्यांची जुनी परवानगी रद्द करुन त्यांच सगळीकडच काम थांबवून त्यांना पूर्ण परवानगी मग ती ४२ कि.मी. असेल ५२ कि.मी. असेल किंवा १०० कि.मी. असेल. पूर्ण परवानगी त्यांना नविन दिली पाहिजे. आणि नंतरच काम चालू केल पाहिजे. तर ह्या गोष्टी तातडीने केल पाहिजे. जे अंडर ग्राऊंड सिव्हरेजच काम चालु आहे. त्यांच काम त्यांनी किती दिवसात रस्ता केला पाहिजे? कुठेतरी नॉर्म्स आहेत. आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे रस्ते झाले पाहिजे. लोकांना अतिशय धुळे, माती आहे. कारण आमच्याकडे depth आहे. लोक ६-६ मीटर खाली जाऊन काम करतात. कठिण आहे काम करण. त्यात सुध्दा काम होत पण ते काम वेळेवर पूर्ण झाल पाहिजे. त्यावर कोणाचेही काहीच टारगेट नाही. एखाद काम हे किती दिवस केल पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

आपण जे मुद्दे सांगितले प्रामुख्याने म्हणजे शिक्षणाच्या संबंधित आहेत. रस्ते दुरुस्ती आहे, पर्यटकांना सुखसुविधा, शौचालय, अनधिकृत फेरिवाले आणि केबल यांच्याशी संबंधित विषय आहे. तर निश्चितपणे मी सांगितल्याप्रमाणे शाळेच्या मुद्दयाकडे मी जातीने लक्ष घालतो. अंडर ग्राऊंड सिव्हरेज सिस्टमच मी कालच विजिट करुन आलो. त्यांना तातडीने आणि लोकांना कमीत कमी त्रास होईल. यासाठी प्रयत्न करण आवश्यक आहे. त्यांनी ठरलेल्या ठराविक कालावधीमध्ये ते काम पूर्ण करावे. त्यासाठी मी सुध्दा प्रयत्नशील राहिल. ठिकठिकाणी शौचालय म्हणजे रोहिदास पाटील साहेबांनी सांगितले की बस थांबे जिथे आहे तिथे बसेसच विश्रामगृह किंवा शौचालय, शांतिनगरमध्ये शौचालयाचा मुद्दा निघाला. त्यावर सध्या मी जास्त बोलणार नाही. पण, तिथे निश्चितपणे आपण प्रयत्न करुन निदान एक शौचालय तरी उपलब्ध करुन देता येईल. तसे प्रयत्न करु. अनधिकृत फेरिवाले हा प्रश्न तसा सामाजिक तसाच प्रशासनाच्या संबंधित आहे. दोन्ही प्रश्नांमध्ये बॅलेंस करुन त्यातुन मध्यम मार्ग काढता येईल तसा आपण प्रयत्न करु. केबलचा आपण विषय काढला. केबल बद्दल मी परवा माहिती घेतली. अजून मला माहिती घेण्याच काम चालु आहे. त्यामध्ये निश्चितपणे आपण सांगता ४२ कि.मी. नंतर ६ कि.मी. ची परवानगी कोणी दिली काय दिली? त्याबद्दल मी स्वतः लक्ष घालीन. पण तो ज्या ठिकाणी शासनाने काही परवानगी दिली असेल आणि आपल्याला ती परवानगी पालन करण्याच बंधन दिल असेल त्या ठिकाणी त्या परवानग्या रोकता येणार नाही. हे कदाचित आपल्यालाही कल्पना असेल. तुम्ही शौचालयाचा मुद्दा उपस्थित केला ते आपण कवर केल. आणि सिलेंडर ब्लास्टचा जो होता ज्या ठिकाणी अनधिकृतपणे सिलेंडर वापरले जातात. त्या ठिकाणी जे सहकारी आहेत त्यांना मी सुचना देईल की निदान फेरिवाले त्यामध्ये दोन भाग करता येईल. जे रस्त्यावर कुकिंग करतात. रस्त्यावरच करतात. ते सुध्दा आरोग्याला हानीकारक राहिले. जर संबंधित अधिकाऱ्याने तातडीने रस्त्यावरच कुकिंग होत असेल, रस्त्यावरच गॅस सिलेंडर ब्लास्ट होत असेल तर जसे अपघात झाले तर मोठ्या अपघाताची नांदी असे इलिगेशन समजून रस्त्यावरचे. कारण फेरिवाले दोन प्रकारचे मोडून शकतो. एक खाद्य पदार्थ तयार करुन विकणारे किंव सर्व सामान्य जनतेला आवश्यक ज्या वस्तु लागतात ते विकणारे. पण निश्चितपणे यामध्ये जे रस्त्यावरच कुकिंग करुन विकत असतील तर त्याच्यावर निश्चितपणे कारवाई करणे आवश्यक आहे. हे मी आताच त्यांना सुचना देतो की जे अनधिकृत फेरिवाले असतील, ते रस्त्यावर कुकिंग करत असतील, गॅस वर म्हणा, रॉकेल वापरुन म्हणा किंवा गॅस सिलेंडरचा वापर करुन म्हणा ते तातडीने त्यांनी थांबवाव. आणि ते बंद कराव.

**प्रमोद सामंत :-**

शासनाने जी परवानगी दिली ते आपण मान्य केली पाहिजे. माझा विषय असा नव्हता. माझा विषय असा होता की ती परवानगी रितसर झाली पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

मान्य आहे मला. रितसर झाली पाहिजे. पण कस आहे की, यामध्ये शासनाने एकदा धोरण ठरवुन दिला असेल. मी यामध्ये अभ्यास केला नाही. मी अभ्यास निश्चितपणे करेल. अस नाही की, आपण काही वेगळ सांगता पण माझ्या वाचनामध्ये काही शासन निर्णय असे आले आहे की, माहिती तंत्रज्ञानविभागाने शासन निर्णय निर्गमित केले. त्यांनी परवानगी देण्याचा अधिकार स्वतःकडे ठेवलेला आहे. त्या-त्या महानगरपालिका किंवा स्थानिक प्राधिकरण असतील त्यांनी काय कराव आणि वसुली करावी. ते सुध्दा ठरवून दिलेला आहे. त्यामध्ये खड्डा बंद करण्यासाठी असतील किंवा लेईंगसाठी असतील तर त्यात एक मुद्दा असु शकतो की, केबल टाकल्यानंतर त्याने किती कि.मी. टाकले? पैसे किती भरले? हा एक मुद्दा आणि केबल टाकल्यानंतर त्या रस्त्याच त्यांनी पूर्वत केल की नाही? त्याचे पैसे भरले की नाही? हा दुसरा मुद्दा. हे २ मुद्दे महत्वाचे आपल्याकडे आहेत. माझ्या सांगण्याच मुद्दा हा आहे की, समजा माहिती तंत्रज्ञान विभागाने महाराष्ट्र शासनाच्या विभागाने त्यांना परवानबी दिली असेल तर ती आपल्याला परवानगी देणे आवश्यक आहे. आणि दुसरा फक्त परवानगी देताना शासनाला किंवा महानगरपालिकेला जो निधी मिळायला पाहिजे हा निधी आणि केबल टाकताना जो काही खर्च झालेला आहे. किंवा रस्ता खराब झालेला आहे. रस्ता दुरुस्तीसाठी जो काही निधी लागणार आहे. तो एकतर त्याने रस्ता दुरुस्त करुन द्यावा. किंवा त्याचा निधी द्यावा. हे दोन मुद्दे आपल्या हस्तांतरीमध्ये आहे. त्या दोन मुद्दयांमध्ये निश्चित लक्ष दिले जाईल.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, स्थायी समितीच्या बैठकीत आल्या बद्दल आपल स्वागत अभिनंदन करतो. कारण ह्याच्याआधी आयुक्त सो. बसत नव्हते. आमची सगळ्यांची अशी विनंती राहिल की, आपल काम असेल तर आम्ही नाही म्हणणार नाही. आपण जायच यायच. पण आमच्या बैठकित बसाव अस संपूर्ण सभागृह ही अपेक्षा करते. जितका वेळा देता येईल तितका वेळ या बैठकित तुम्ही द्यावा. आणि सगळ्यांची समस्या आहे. आपण आलात. गाव आपल स्वागत करीन. वाहतुक समस्या साहेब मोठी आहे. वाहतुक समस्यातल एक कारण आहे. जे आपण नविन रस्ते बनवतो एक-एक कोटीची सगळ आपण काम काढलेली आहे. पण जिथे नस्ती आहे आणि रस्त्याची डागडुजी आहे. ती डागडुजी त्याच पॅचवर्क काम होत नाही. त्यामुळे आणखीन ट्राफिक होत. मग कुठे केबल टाकले, बस जाते आवाज मारते, बिल्डींग हलते अशी आपली भाईंदरची रचना आहे. त्यामुळे सगळ्यांच्या वतीने जितक्या लवकर पॅचवर्कच जे काही काम करता येईल त्या संबंधित अधिकात्यांना सुचना द्या. लोक आपल्याला धन्यवाद देतील.

**हेलन गोविंद :-**

सन्मा. आयुक्त साहेब, आम्ही खरोखर तुमच अभिनंदन करतो. कारण, तुम्हाला जास्त दिवस पण नाही झाले येऊन. आमच्या पहिल्या मिटींगला आले. खरोखर आम्हाला बर वाटल. आणि आज जे शांततेने वातावरण राहिल असाच जेवढ तुम्हाला वेळ भेटेल तेव्हा आम्हाला देण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे आम्ही आमच्या समस्या तुम्हाला सांगायला.

**संदिप पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, माझी तुम्हाला एक विनंती आहे की, प्रत्येक प्रभागामध्ये नगरसेवकांना घेऊन तुम्ही व्हिजिट मारावी. कारण, गेली पाच महिने झाली आम्ही आयुक्त साहेबांना सांगत होतो. पण कधी व्हिजिटचा टाईम त्यांना मिळाला नाही. माझी विनंती अशी राहील की, नगरसेवकांना एक वेळ टाईम देऊन त्यांच्या प्रभागामध्ये फेरी मारावी. म्हणजे त्यांच्या काही समस्या असतील त्याच निवारण करता येईल आपल्याला.

**मा. आयुक्त :-**

चालेल. जेव्हा-जेव्हा मला वेळ मिळेल त्यावेळी आपल्या सोबत बसायला मला अडचण नाही. निश्चितपणे सांगु शकणार नाही. इतका वेळे बसेल अस पण वेळ काढुन येण्याचा प्रयत्न करेन. हा एक भाग आणि प्रत्येक प्रभागामध्ये फेरी मारायची असेल, वाहतुक समस्या सोडवण्यासाठी असेल किंवा रस्त्यावरील खड्डे त्याच्यावर सुध्दा निश्चितपणे आपल्या सुचनांचा विचार करुन त्यावर आवश्यक ती कारवाई करता येईल. शहरामध्ये माझ्या भेटीगाठी निश्चितच होतील. आपण सोबत असले तरी त्यामध्ये मला अडचण राहणार नाही.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग-०१ ते वर्ग-०४ चे एकुण १५४६ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके पडताळणी तसेच वेतन निश्चिती पडताळणी करणे आवश्यक असुन याकामी शासनाकडील संचालक, संचालनालय लेखा व कोषागरे कडील (सेवा निवृत्त) लेखाधिकारी श्री. आर. आर. तिवारी, (R & R Consultancy) यांनी सेवा निवृत्त वेतन निश्चिती सेवा पुस्तक पडताळणी करणेची रक्कम रु. २००/- (अक्षरी रु. दोनशे मात्र.) सेवा पुस्तक पडताळणी करणेची तयारी दर्शविली आहे. याकामी मुख्यलेखा परिक्षक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी श्री. आर. आर. तिवारी, (R & R Consultancy) यांचेशी दराबाबत वाटाघाटी करुन सेवा पुस्तक पडताळणी करणेकामी रक्कम रु. १५०/- (अक्षरी रु. एकशे पन्नास मात्र.) दरानुसार काम करणेची श्री. आर. आर. तिवारी, (R & R Consultancy) सेवा निवृत्त, यांनी तयारी दर्शविली आहे.

वर्ग-०१ ते वर्ग-०४ चे एकुण १५४६ सेवा पुस्तकांचे प्रती रक्कम रु. १५०/- (अक्षरी रु. एकशे पन्नास मात्र.) प्रमाणे एकुण रक्कम रु. २,३१,९००/- (अक्षरी रु. दोन लाख एकतीस हजार नऊशे मात्र.) इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर कामासाठी अंदाजे एक वर्षाचा कालावधी लागणार आहे. तरी श्री. आर. आर. तिवारी, (R & R Consultancy) सेवा निवृत्त, यांना रक्कम रु. १५०/- (अक्षरी रु. एकशे पन्नास मात्र.) प्रतिसेवा पुस्तक पडताळणी करणेकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेत येत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांचे सेवापुस्तके पडताळणी करणेबाबत.

**ठराव क्र. २८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग-०१ ते वर्ग-०४ चे एकुण १५४६ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके पडताळणी तसेच वेतन निश्चिती पडताळणी करणे आवश्यक असुन याकामी शासनाकडील संचालक, संचालनालय लेखा व कोषागरे कडील (सेवा निवृत्त) लेखाधिकारी श्री. आर. आर. तिवारी, (R & R Consultancy) यांनी सेवा निवृत्त वेतन निश्चिती

सेवा पुस्तक पडताळणी करणेची रक्कम रु. २००/- (अक्षरी रु. दोनशे मात्र.) सेवा पुस्तक पडताळणी करणेची तयारी दर्शविली आहे. याकामी मुख्यलेखा परिक्षक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी श्री. आर. आर. तिवारी, (R & R Consultancy) यांचेशी दराबाबत वाटाघाटी करुन सेवा पुस्तक पडताळणी करणेकामी रक्कम रु. १५०/- (अक्षरी रु. एकशे पन्नास मात्र.) दरानुसार काम करणेची श्री. आर. आर. तिवारी, (R & R Consultancy) सेवा निवृत्त, यांनी तयारी दर्शविली आहे.

वर्ग-०१ ते वर्ग-०४ चे एकुण १५४६ सेवा पुस्तकांचे प्रती रक्कम रु. १५०/- (अक्षरी रु. एकशे पन्नास मात्र.) प्रमाणे एकुण रक्कम रु. २,३१,९००/- (अक्षरी रु. दोन लाख एकतीस हजार नऊशे मात्र.) इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर कामासाठी अंदाजे एक वर्षाचा कालावधी लागणार आहे. तरी श्री. आर. आर. तिवारी, (R & R Consultancy) सेवा निवृत्त, यांना रक्कम रु. १५०/- (अक्षरी रु. एकशे पन्नास मात्र.) प्रतिसेवा पुस्तक पडताळणी करणेकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेत येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २९, केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत नविन बसेस व साधन सामुग्री मंजूरी बाबत.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, इस गोषवारा संदर्भ मे जो सल्लागार समिती के बारे मे बताया गया। इसमें लास्ट टाईम निधी आया था। उसके अंदर अपनी महानगरपालिका compitant enough है। अपनी महानगरपालिका खुद भी रिपोर्ट भेज सकती है। सल्लागार समिती एक ऑपशन दिया गया है। अगर अपने अधिकारी नही कर सकते तो आप वह सेवा ले सकते है। Not a hundred percent must की ऐसा करना जरुरी है। यह काम अपने अधिकारी कर सकते है। यह निर्देश में आया हुआ है। सावंत साहेब ॲग्री करेंगे। अपने अधिकारी सक्षम है। सल्लागार समिती essencial है, ऐसा कोई नहीं है। दुसरी बात डी.पी.आर. तयार करने का, इसका काम क्या है की, वहाँ पर डी.पी.आर. भेजो। डी.पी.आर. भेजने से बसे अलग होगी। पिछली बार भी हमने सल्लागार अपॉईंट किया था। कभी उनका कन्सल्टंट काम नही आया था। ऐसे बिका नही गया। उन्होंने १५० बसेस का प्रस्ताव भेजा था। आए तो सिर्फ ५० बसेस, इसका मतलब की कन्सल्टंट ने कुछ बराबर नहीं किया। और उसको पैसा देने का १%, २% फिक्स किया गया है। तो हम लोअर साईड में फिक्स कर सकते है। इस अहवाल के अंदर कितना देना है, यह भी नहीं लिखा गया है। और जो डी.पी.आर. के अंदर कुछ भी नहीं है। युनिटी भाईंदर लिखा है। और रुट बसेस को डीफाइन नहीं किया है। उसके अंदर लिखा है की, पॉप्युलेशन इतना है, तो इतना-इतना बस होना चाहिए। और पिछली बार जब मैंने पुछा था। तब यह कहाँ था की, कितनी बसेस लगी थी, वह आने के बाद डिसाईड करेंगे। यानी रुट नहीं मालुम फिर भी बसेस लेते है। कहने का मतलब में यह चाहता हुँ की, हमारे अधिकारी पहले भेजे, अपना डी.पी.आर. नही होता है, तो ट्राय करे। मार्च आ रहा है तो, हर साल होता है। अभी यह बहाना आएगा की, लास्ट टाईम की अभी टाईम नही है। मेरा यह रिक्वेस्ट है की, पैसा बचाने के लिए दुसरा कहाँ जाता है की, पैसा हम नहीं दे रहे है, वहाँ से आ रहा है। आम लोगो का इनकम टॅक्स, सेल्स टॅक्स सब पैसा कहीं ना कही से नहीं आता है। हवा से नहीं आता है। पैसा हम नागरिक का ही है। पैसा हम नागरिक का ही है। तो अधिकारी इतने सक्षम होना चाहीए। अपनी रिपोर्ट भेजे रिपोर्ट भेजनेसे भी अगर पैसा नही आता है तो सल्लागार समिती को अपॉईंट करे।

**हेलन गोविंद :-**

सन्मा. उपायुक्त साहेब, आता नविन बसेसचा ठराव घेतलेला आहे आमचे उत्तन ते चौक परिसरामध्ये किती वर्षे झाले बसेस एकदम गुरासारखे भरून जातात. त्याच्यानंतर बसेस रस्त्यामध्ये खराब होतात लोकांच आम्हाला ऐकावं लागत बसमध्ये जायला एकदम लाज वाटते आणि लोक बोलतात की, ह्या बघा नगरसेविका आहेत यांना एवढं वर्ष झाले कळत नाही साहेब, तुम्ही एक दिवस या मी तुम्हाला स्टेशनला घेऊन जाईल काय परिस्थीती असते, चौक ची लोक, उत्तन पालीची लोक एकदम ढोरासारखी बसेस भरुन जातात ना आमच एकच म्हणणं आहे बसेस येतात तर तुम्ही वाढवा ना आणि ज्या खराब बसेस आहेत त्या कंडीशनमध्ये आहे की नाही ते तुम्ही बघा लोकांना आम्हाला तोंड द्याव लागते. साहेब, आम्ही तुम्हाला पण घेऊ जाऊ कारण एवढं वर्ष ऐकुन बस झालं आम्हाला लाज वाटते बसमध्ये जायला.

**राजेंद्र जैन :-**

इन्होंने मेरे बात को समर्थन किया है।

**दिपक सावंत :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, केंद्र शासनाच्या जेएनएनयुआरएम योजना आहे. योजने अंतर्गत अर्बन ट्रान्सपोर्ट ज्या बसेस खरेदी करताना त्याच्यासाठी सन २००९ मध्ये प्रथमतः पूर्ण भारतामध्ये बसेस अलॉटमेंट केले याच्यासाठी ५० टक्के फायनान्स हे केंद्र शासनाचा होता आणि उरलेले ५० टक्के फायनान्स मध्ये महापालिकेचा होता जे ५० टक्के केंद्र शासनाकडुन येते त्याच्यामध्ये ३५ टक्के केंद्र शासन आणि १५ टक्के राज्य शासन असं होत आपण २००९ साली ईएमटीसी आता जे मी प्रपोजल दिले त्या कंन्सटन्ट कडुन मिरा भाईंदर साठी डीपीआर बनवून घेतला होता २५० बसेससाठी तो डीपीआर फर्स्ट होता तो डीपीआर आपण केंद्र शासनाला सबमिट केला सर्वच राज्यातील महानगरपालिका आहे त्यांनी सर्वांनी सबमिट केला तर त्यांचे जे अलॉटमेंट होते १५ हजार बसेस त्याच्यातल्या त्यांनी ५० बसेस अलॉट केल्या होत्या त्याच्यानंतर ती कारवाई त्या बसेस अलाऊड आल्यानंतर जे अनुदान ग्रँड करायचं होत आपल्याला सर्व रिपोर्ट पार्कींग पॉलिसी, ॲडव्हटाईजमेंट पॉलीसी, बस स्पेसिफिकेशन सर्व गोष्टी आपण करुन ९० टक्के केंद्र शासनाने आपल्याला ग्रँड ९० टक्के मंजुर केलेली आहे आजपर्यंत ते १० टक्के ग्रँड मंजुर आहेत आपल्याला सर्व त्याचं डिटेल करुन परत पाठवायच होत ते आपण पाठवून दिलं ते १० टक्के सुध्दा मंजुर होतील. मिन व्हाईल १७ जानेवारीला केंद्र शासनाने एक सर्क्युलर काढलं की, कोणते जे अर्बन, लोकल बॉडीज आहे. त्यांना कोणाला फक्त अर्बन ट्रान्सपोर्टचं नाही तर इतर पण जे आपले जेएनएनयुआरएम चे जे प्रोजेक्ट आहे त्याच्यामध्ये तुम्हाला जे प्रोजेक्ट द्यायचं असेल ३१ मार्च पर्यंत तुम्ही द्या आम्ही त्या फेजमध्ये तुम्हाला बसेस असतील किंवा तुमच प्रोजेक्ट सेन्शन करु हे प्रोजेक्ट सेक्शन करताना जैन साहेब बोलले की, आपण पण करु शकतो. आपण २०११ मध्ये २० बसंचा प्रोजेक्ट स्टँडींग समितीची मंजुरी घेऊन तयार केला होता २० बसेसचं टेंडरचं डीपीआर आपण स्वतः तयार केला होता. पण केंद्र शासनाने त्याला संन्शन केलं नाही. आपण करुन पाठवला होता तर हे कंन्सल्टेड आहे त्याची सर्व जबाबदारी आहे. सॅक्न्शन करुन देणे सगळं करुन देणे ही त्यांची जबाबदारी आहे आणि ह्याच्यामध्ये आपण स्वतः काहीही खर्च करणार नाही जो प्रोजेक्ट कॉस्ट आहे सपोस टू बी ५० बसेस साठी आजच्या परिस्थीती मध्ये ५ करोड रुपये खर्च आहे तर त्याच्या १ टक्के मिनीमम, मॅक्झीमम २ टक्के एवढ्या मध्ये डीपीआर ची कॉस्ट केंद्र शासन सँन्शन करणार आहे आणि तेच आपल्याला रिलीज करणार आहे विदइन द परमिशन लिमिट तसा त्यांचा मेल पण आहे त्या लिमिटमध्ये आम्ही करु आपण काहीही पैसे त्याला देणार नाही केंद्र शासनाचा अनुदान आहे तेवढंच अनुदान आहे.

**संदीप पाटील :-**

साहेब, माझा प्रश्न आहे आपल्या ज्या बसेस आहेत त्या बसेस रिपेअरींगसाठी स्वतःची कार्यशाळा आहे का?

**दिपक सावंत :-**

हो, ह्या बाबतीत पण तुम्ही मुद्दा उपस्थित केला ह्याच्यामध्ये साधन सामग्री, बसेस फक्त नाही तर डेपो म्हणजे प्रथमतः जेएनएनयुआरएम मध्ये डेपोसाठी सुध्दा ते अनुदान देणार आहे ५० टक्के कार्यशाळा नाही आपण २००५ पासून आपल्या बसेस सुरु झाल्या तेव्हापासूनच ब्रिजच्य खाली रिपेअर करतो ते आपण भाईंदर स्टेशनच्या बाजुला ते एस.टी. चं डेपो आरक्षण आहे त्या जागेची मागणी केलेली आहे ते बोलणे आता आणखीन टप्प्यामध्ये आहे.

**संदीप पाटील :-**

परिवहन मध्ये आता आपल्या किती बसेस चालु आहे आणि किती बसेस बंद आहे?

**दिपक सावंत :-**

आज आपल्याकडे ५३ बसेस चालू आहेत २ बसेस स्टँड अप आहे म्हणजे टोटल ५५ बसेस आहेत आणि ८ बसेस अंडर रिपेअर आहे.

**संदीप पाटील :-**

तर एवढ्या बसेस असताना आपली स्वतःची कार्यशाळा कशाला नाही?

**दिपक सावंत :-**

कार्यशाळा नाही आपला जो प्रोजेक्ट आहे पीपीपी तत्वावर आऊट सोर्सिंग केलेलं आहे आपल्याकडे परिवहन बघितलं तर परिवहन व्यवस्थापक, परिवहन उपव्यवस्थापक आणि एक क्लार्क त्याच्या व्यतिरीक्त आपल्याकडे काही स्टाफ नाही जो ५५० स्टाफ आहे तो कॉन्ट्रॅक्टरच्या अंतर्गत काम करतो.

**संदीप पाटील :-**

आपल्याकडे कार्यशाळा नसल्यामुळे तर बस बिघडली तर बस रिपेअरींग करण्यासाठी आपण दुसऱ्याकडुन माणंस मागवणार मग रिपेअर करणार.

**दिपक सावंत :-**

आपण काहीच नाही करणार रिपेअर वगैरे कॉन्ट्रॅक्टर करणार त्याची एक टीम आहे पण त्यांना जागा नाही तर ते जे वर्क शॉप बांधण्यासाठी ........

**संदीप पाटील :-**

जिथे बस उभी असते तिथे १-१, २-२ दिवस उभी असते त्याचं निरसन झाले पाहिजे. आता उत्तन चौक पासुन ते स्टेशन रोड हा सिंगल रोड आहे त्याच्यामध्ये काय होत की, एक बस जर बिघडली आणि ती १ दिवस उभी राहीली तर ट्रॅफिक पूर्ण जाम होते.

**बर्नड डिमेलो :-**

शहरामध्ये भाईंदर इस्ट असो की, मिरारोड असो आपल्या मिरा भाईंदर मध्ये टीएमटी, बीएमटी सगळ्या बसेस येतात उत्तन मध्ये जाण्यासाठी एकच पर्याय आहे कारण आपण एसटी महामंडळाच्या बसेस बंद केल्या आता ह्या मोठ्या बसेस असल्या कारणामुळे जरी त्या पॉवर स्टेरींग असल्या तरी रस्ते एवढे छोटे झालेले आहे फेरीवाल्यांचा प्रश्न काढला त्यांनी अतिक्रमण केली आहे बाजार आपण स्वतः महापालिकेने बांधलेली आहेत. इथे बाहेर बसतात आपण जर एकदाच प्रकार झाला तर मला तरी हे वाटते की, महापालिकेला मोठ्या प्रमाणात नको हे द्यायला. तर त्याच्यासाठी आपण छोट्या बसेसची काही व्यवस्था केली आहे का?

**हेलन गोविंद :-**

साहेब, मिनी बसचं केलं तर बर होईल.

**दिपक सावंत :-**

सध्या ठेकेदाराने स्वतःच्या घेतलेल्या ७ मिनी बसेस आहेत.

**शर्मिला बगाजी :-**

आमच इथे कुठेच आले नाही.

**हेलन गोविंद :-**

उत्तन, चौक परिसरामध्ये मिनी बस ठेवल्या तर खुप बर होईल.

**संदीप पाटील :-**

साहेब, कसं आहे माहित आहे का? तिथे छोटे रुट आहेत उत्तन चौक डोंगरी हा छोटा रुट आहे त्याच्यामध्ये टर्निंग एवढी आहे की, मोठी बस पास व्हायला खुप त्रास होतो.

**दिपक सावंत :-**

तिथे छोटे मिनी बसेसची व्यवस्था करण्यात येईल.

**हेलन गोविंद :-**

साहेब, खुप त्रास होतो तुम्ही उत्तन चौक ला मिनी बस पाठवलं तर बर होईल आणि रिसॉर्ट जास्त असल्यामुळे आमच्या लोकांना तोटा आहे तिथे आमच्या लोकांना यायला नाही मिळत मॉरस शेटचं तिथून लोक परत केवळ पाली चौकला रिसॉर्ट आहे तिथे लोक जास्त येतात आणि १२ डब्बा तर बंद केला आहे त्यामुळे आमच्या लोकांचे खुप हाल होतात त्यामुळे मिनी बस जास्त वाढवल्या तर बर होईल.

**शर्मिला बगाजी :-**

साहेब, एक प्रश्न होता आपले जे रुट आहेत तिथे फिक्स आहेत का बसेस किती आहे ते?

**दिपक सावंत :-**

हो.

**शर्मिला बगाजी :-**

साधारण तुम्ही अंदाजे सांगु शकता का? भाईंदर स्टेशन ते उत्तन चौक पर्यंत किती बसेस चालतात?

**दिपक सावंत :-**

१९ बसेस चालतात.

**शर्मिला बगाजी :-**

त्यांचा टाईम टेबल फिक्स आहे का?

**दिपक सावंत :-**

हो टाईम टेबल फिक्स आहे.

**शर्मिला बगाजी :-**

तुम्ही टाईम टेबल देऊ शकता का?

**दिपक सावंत :-**

हो

**शर्मिला बगाजी :-**

टाईम टेबल द्या तरी किंवा डिसप्ले तरी करा कारण संध्याकाळचे किती प्रॉब्लेम होतात.

**दिपक सावंत :-**

लावला होता.

**हेलन गोविंद :-**

साहेब, आमच्या उत्तन, चौक, पाली परीसामध्ये लावा ना म्हणजे लोकांना बर होईल लोक टायमिंग वगैरे बघतील ना?

**संदीप पाटील :-**

सावंत साहेब, माझी एक सुचना आहे एक वेळ आपण सगळे सदस्य बसमधुन चौक ते स्टेशनला जाऊन येऊ म्हणजे तुम्हाला कळेल काय त्रास भोगायला लागत ते कळेल.

**हेलन गोविंद :-**

साहेब, आम्ही अनुभव घेतो तर तुम्ही पण घ्या म्हणजे तुम्हाला समजणार आम्ही खरं बोलतो की खोटं?

**दिपक सावंत :-**

बरोबर आहे तुम्ही बोलता ते उत्तन ते चौक पर्यंतच्या बाई अक्षरशः रडतात त्यांच्या शिव्या आम्हाला ऐकायला लागतात. लास्ट टाईम आपण ज्यावेळेस २५० बसेसचा प्रपोजल पाठवलं होतं त्याच्यामध्ये सव्वा दोनशे मोठ्या आणि छोट्या २५ होत्या आता हे नविन आपण त्यापेक्षा ५०चं बसेस सॅन्शन केल्या छोटी बस त्यावेळी कोणालाही सॅन्शन केली नव्हती त्यानंतर त्यांचे नॉर्मस चेंज झाले आता आपण साधारण १०० बसेसचा प्रपोजल करायला सांगतो त्यात २५ मिनी बसेस आणि ७५ मोठ्या बसेस करायला सांगतो.

**हेलन गोविंद :-**

सावंत साहेब, मिनी बसच तुम्ही प्रत्येक वेळेला सांगता पण ते कागदोपत्री राहते किती वर्ष झाली आम्ही सांगतो तुम्ही बोलता पण प्रॅक्टीकली करत नाही. साहेब, आता अती झालं आहे लोक मोर्चा आणायला पण निघालेले पण आम्ही त्यांना रोकलं म्हणून ते थांबले ते आमचं ऐकतात म्हणून बर आहे नाहीतर आंदोलनच झाली असती.

**दिपक सावंत :-**

मी ठेकेदाराला सांगतो.

**शर्मिला बगाजी :-**

सर, त्याच काय म्हणणं आहे की, साधारण बस कधीपर्यंत स्टार्ट होतील?

**दिपक सावंत :-**

तिकडून मंजुरी आल्यानंतर प्रोसेस सुरु होते.

**रोहीदास पाटील :-**

तुम्ही निवेदन केलं ५२ बसेस रनिंग मध्ये आहे.

**दिपक सावंत :-**

५३ बसेस रनिंग मध्ये आहे २ रिपेअर ला आहे.

**रोहिदास पाटील :-**

ते कधीपासून आहे या महिन्यापासून आहे की २ महिन्यापूर्वीपासून आहे.

**दिपक सावंत :-**

दररोजच आहे डेली रीपोर्ट आहे १५ दिवसापासूनचा रिपोर्ट आहे.

**रोहिदास पाटील :-**

यातली एक बस कमी झाली नाही एक बस वाढली नाही बरोबर आहे मग तुम्ही सर का कमी केले? आमचा २३ नंबरचा रुट का कमी केला तुम्ही? २३ नंबरच्या रुट वरच्या फेऱ्या तुमच्या कमी झाल्या त्याकुठे फिरवल्या त्याच तुमच्याकडे उत्तर आहे? तुमच्या ५३ बसेस आज चालु नाही.

**दिपक सावंत :-**

साहेब, माझ्याकडे सकाळचा मॅसेज आहे.

**रोहीदास पाटील :-**

ही सभा तुम्हाला विनंती करते आजचा ताजा रिपोर्ट घ्या आज ५३ बसेस चालू आहे की नाही ५३ बसेस रस्त्यावर चालू नाही.

**दिपक सावंत :-**

५३ बसेस चा दरारोजचा रिपोर्ट येतो.

**रोहीदास पाटील :-**

ही सभा तुम्हाला विनंती करते, ५३ बसेस चालू आहे तर २३ नंबरचा रुट का बंद झाला? तुम्ही जे रुट बंद केले दुसरीकडे कुठेही वाढवले नाही उत्तनकडे फेऱ्या नाही, मिरारोड मध्ये फेऱ्या नाही पेणकरपाड्याला फेऱ्या नाही बस रुट बरोबर झाले, फेऱ्या कमी झाल्या मग ५३ बसेस चालतात कुठे? तुमच्याकडे ह्याचं उत्तर नाही आहे. बझ्झर आपली सभा सुरु होते तुम्ही पुढच्या वेळेला हा विषय घ्या आणि ठेकेदारावर तुम्ही वजन द्या पाठपुरावा घ्या त्यांचा आम्ही अशी तुम्हाला विनंती करतो खरोखर तिकडे फेऱ्या झाल्या की नाही लोकांची सेवा आहे आपली सेवा नाही.

**प्रमोद सामंत :-**

आपल्याकडे जीपीआरएस सिस्टम आहे ना?

**दिपक सावंत :-**

आहे ना.

**प्रमोद सामंत :-**

मग त्याचा रिपोर्ट येत असेल ना तुम्हाला

**दिपक सावंत :-**

येतो.

**शरद पाटील :-**

सावंत साहेब आपण तातडीने विषय आणतो प्रत्येक वेळेला बसचा विषय तातडीने येतो तुम्हाला पहिलाच माहिती नव्हती का? असं काय होणार आहे असं येणार आहे?

**दिपक सावंत :-**

१७ जानेवारीला सर्क्युलर निघालं आहे.

**शरद पाटील :-**

गेल्या वेळेला पण ज्या बसेस आल्या होत्या त्यावेळेला पण असंच विषय होता तुम्ही लवकर करा आताच्या आता मंजुरी द्या असणाऱ्या अधिकाऱ्याला त्या मॉडेलचं नाव माहित नव्हत त्याला कुठचं लागलं नव्हतं त्याला २ लाख रुपये खर्च होतो असं काहीच माहीत नसंत म्हणजे आपल्याकडुन त्याची नीट चौकशी होत नव्हती का पाठपुरावा नीट होत नव्हता?

**दिपक सावंत :-**

साहेब, त्याच्यामध्ये काय आहे की, केंद्र शासनाने जे सर्क्युलर काढलं ते १७ जानेवारीला काढलं की, तुम्ही प्रप्रोजल टाका म्हणून आता जे प्रपोजल पेंडींग असेल ते ३१ मार्चपर्यंत करणार.

**शरद पाटील :-**

मला एक सांगा आपण आपला फंड बरोबर दिलेला आहे.

**दिपक सावंत :-**

कुठला?

**शरद पाटील :-**

ह्याच्यातला.

**दिपक सावंत :-**

नाही ह्याच्यातला फंड नाही दिला आपण.

**शरद पाटील :-**

पुढच्या बसेसचा आपण फंड दिला आहे त्याचे पैसे आले पहिल्या बसचे?

**दिपक सावंत :-**

९० टक्के मंजुर झालेले आहे.

**शरद पाटील :-**

कधी आता मंजुर झालेले आहे म्हणजे एवढ्या उशीरा येतात तर त्याचा तुम्ही पाठपुरावा करत नाही का?

**दिपक सावंत :-**

पाठपुरावा करतो ते प्रत्येक सीएसएम चं असते प्रत्येक जे जेएनएनयुआरएमचं प्रोजेक्ट आहे. प्रत्येक वेळेस ५० टक्के, २५ टक्के, १० टक्के असे सॅक्शन करणार.

**शरद पाटील :-**

आता हा विषय हे पॉलिसी मॅटर आहे हा महासभेचा विषय आहे तुम्ही स्टँडींग पुढे आणला.

**बर्नड डिमेलो :-**

हे खरेदी थोडी करतात केंद्र सरकार पैसे देणार आहे हे खरेदी करण्यासाठी तुम्ही पैसे खर्च करत नाही पैशाची मागणी करतात.

**शरद पाटील :-**

याची सामग्री जी खरेदी करायची त्याची आपल्याकडुन मंजुरी करुन घेतात.

**दिपक सावंत :-**

नाही सल्लागार नेमायचा आहे.

**राजेंद्र जैन :-**

